दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | मंगळवार , 13 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 150 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा.
मो. 8421577797
आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com



## रणांच्या बांधकामांचे होणार सुरक्षेच्या दृष्टीकोनातून मुल्यांकन समितीच्या माध्यमातून बनवला जाणार अहवाल

■ मुंबई वृत्तसंस्था

मुंबई महापालिकेच्या तानसा, मोडकसागर, मध्य वैतरणा, पिसे, तुळशी व विहार या धरणांसाठी सर्वकष धरण सुरक्षा मूल्यांकन समिती अहवाल तयार करण्यासाठी आता तज्ज्ञांची नेमणूक करण्यात येणार आहे. ही मुल्यांकन समिती प्रत्येक धरणाच्या ठिकाणी स्थळ भेटी देवून मुल्यांकन अहवाल तयार करणार आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील व मालकीच्या तानसा, मोडकसागर, मध्य वैतरणा, पिसे, तुळशी व विहार या धरणांतुन मुंबई शहराला दैनंदिन पाणी पुरवठा केला जातो. केंद्र शासनाने धरण सुरक्षा कायदा, २०२१ भारताच्या अधिकृत राजपत्रात प्रकाशित केला असून ३० डिसेंबर २०२१ पासून अंमलात आणला आहे. धरण सुरक्षा अधिनियम २०२१ च्या कलम ३८ नुसार धरणाच्या मालकाने त्या धरणाची आणि त्यांच्या जलाशयाची स्थिती निश्चित करण्याच्या उद्देशाने, नियमानुसार गठीत केलेल्या तज्ञांच्या स्वतंत्र समितीमार्फत प्रत्येक धरणाचे सर्व समावेशक धरण सुरक्षा मुल्यांकन स्वतः करावे किंवा करुन घ्यावे.

परंतु, प्रत्येक विद्यमान धरणाचे पहिले सर्वसमावेशक धरण सुरक्षा मुल्यांकन या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून पाच वर्षाच्या आत केले जावे आणि त्यानंतर अशा प्रत्येक धरणाचे सर्व समावेशक धरण सुरक्षा मुल्यांकन नियमांनुसार विनिर्दिष्ट केलेल्या नियमित अंतराने केले जावे असे नमुद केले आहे. या धरणांचे धरण सुरक्षा कायदा-२०२१ व राष्ट्रीय धरण सुरक्षा प्राधिकरण यांच्या आवश्यकतेनुसार सर्वकष धरण सुरक्षा मुल्यांकन हे स्वंतत्र तज्ञ समितीकडून डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. राज्य धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांना धरण मुल्यांकन समितीबाबत पत्रव्यवहार केला आहे. तसेच, धरण सुरक्षा संघटना नाशिक व राष्ट्रीय धरण सुरक्षा प्राधिकरण यांजकडून वारंवार पत्रव्यवहार व व्हिसी द्वारे संपर्क साधून तात्काळ अहवाल सादर करण्याचा सूचना दिल्या आहेत. अन्यथा धरण सुरक्षा कायदा अंतर्गत योग्य ती दंडात्मक कारवाई करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे. म्हणून मुल्यांकन समिती नेमणुक करण्यास प्रस्ताविले आहे.कोकण विभागातील तज्ञ समितीला मुंबई महानगरपालिकेच्या धरणाचे मुल्यांकन करण्याकरीता संमती विचारली असता त्यांनी संमती दर्शविली आहे.

महाराष्ट्र शासनाने नेमून दिलेल्या धरण सुरक्षा मुल्यांकन समितीतील प्रत्येक तज्ञ आपले तांत्रिक विषयानुसार काम करणार असल्याने उपरोक्त शासन निर्णयानुसार त्यांचे मानधन, प्रवास भत्ता व राहण्याचा तसेच जेवणाचा इत्यादी खर्च, समितीतील प्रत्येक सदस्यांना स्वतंत्र देणे आवश्यक आहे असे त्यांनी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे. त्या अनुषंगाने, तानसा, मोडकसागर, मध्य वैतरणा, पिसे, तुळशी व विहार या धरणांची मुल्यांकन समितीची स्थळ भेटी आणि मुल्यांकन अहवाल तयार करण्यास ४५ लाख ९० हजार रुपये मानधन दिले जाणार आहे.

## घनकचरा व्यवस्थापन, मलनि:सारण आणि मिठी नदी पुनरुज्जीवनासाठीच्या महानगरपालिकेच्या कामाबाबत पर्यावरण मंत्री समाधानी

■ मुंबई वृत्तसंस्था

मुंबईतील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अभिनव उपाययोजना केल्या जात आहे. राडारोड्याचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रथमच संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी राज्य सरकारकडून प्रभावी व्यवस्था केली जात आहे. तसेच, मिठी नदी पुनरुज्जीवनासाठी महानगरपालिका प्रशासन प्रभावीपणे कार्य करत आहे. तसेच, मलजल प्रक्रिया केंद्रांची निर्मितीची प्रक्रियाही गतीने सुरू आहे. या सर्व उपाययोजना प्रभावी आणि समाधानकारक आहे, असे राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.




पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेत मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा, मलनि:सारण आणि मिठी नदी पुनरुज्जीवनाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यायलयात सोमवारी १२ ऑक्टोबर २०२६ रोजी बैठक पार पडली. मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अविनाश ढाकणे, उप आयुक्त (आयुक्त कार्यालय) प्रशांत गायकवाड, उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे तसेच महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुंबईत निर्माण होणाऱ्या बांधकाम आणि पाडकाम राडारोड्याचे व्यवस्थापन, वाहतूक, प्रक्रिया आणि विल्हेवाट यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने 'मुंबई डेब्रिज कंट्रोल अँड ट्रॅकिंग सिस्टीम' ही सुविधा कार्यान्वित केली आहे. यावर आतापर्यंत २५५ आस्थापनांनी नोंदणी केली आहे. मुंबईतील २३१ कचऱ्याच्या संवेदनशील ठिकाणांचे निर्मूलन करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. कचऱ्यापासून ऊर्जा (वेस्ट टू एनर्जी) निर्मितीसाठी प्रकल्प उभारले जात आहेत. मुंबईत साधारणपणे २०२८ पर्यंत सात मलजल प्रक्रिया केंद्र कार्यान्वित होतील. तसेच, मिठी नदी पुनरुज्जीवनासाठी देखील योग्यप्रकारे उपाययोजना करण्यात येत आहेत, अशी माहिती यावेळी संगणकीय सादरीकरणाच्या माध्यमातून सादर करण्यात आली.

त्यानंतर, पंकजा मुंडे म्हणाल्या, मुंबईतील घनकचरा व्यवस्थापन अत्यंत आव्हानात्मक कार्य आहे. कचऱ्याच्या विलगीकरणाची प्रक्रिया अधिक प्रभावी होणे आवश्यक आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून याबाबत प्रभावी उपाययोजना केल्या जात आहेत. तथापि, नागरिकांनीदेखील स्वच्छता राखून आणि कचरा विलग करुनच सोपवायला हवा. राडारोडा व्यवस्थापनासाठी महानगरपालिकेने प्रभावी प्रणाली विकसित केली आहे. मलनि:सारणाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने उभारलेले मलजल प्रक्रिया केंद्र (एसटीपी) नक्कीच प्रभावी आहेत. राज्य सरकारकडून राज्यातील नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी व्यवस्था निर्माण केली जात आहे. तथापि, मुंबईतील मिठी नदीच्या पुनरुज्जीवनासाठी महानगरपालिकेकडून टप्पेनिहाय कामकाज सुरू आहे, ही समाधानकारक बाब आहे., असेही त्यांनी सांगितले.

## चित्रपटसृष्टीपेक्षा नानांचे समाजकार्य मोठे ; दुष्काळात अनेकांचे संसार उभे केले" : माजी आमदार बाळासाहेब आजबे

### शिराळ येथे नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली ; जलसंधारणाच्या कामातून गावावर उपकार, नाम फाउंडेशनच्या कार्याचे स्मरण

■ आष्टी (प्रतिनिधी)

महाराष्ट्राने देशाला राजकारण, चित्रपटसृष्टी, समाजकारण आणि विविध क्षेत्रांत अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वे दिली. मात्र, अलीकडच्या काळात राजकारण आणि चित्रपटसृष्टीतील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांच्या निधनामुळे महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर अभिनेते आणि सामाजिक कार्यकर्ते नाना पाटेकर यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली आहे. नाना पाटेकर यांचे चित्रपटसृष्टीतील योगदान महत्त्वाचे असले, तरी त्यांनी समाजकार्यातून सर्वसामान्यांच्या जीवनात केलेले परिवर्तन अधिक मोठे आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्र पोरका झाला, अशा शब्दांत माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

शिराळ, ता. आष्टी, जि. बीड येथे दि. १२ रोजी सकाळी ९ वाजता स्वर्गीय नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत माजी आमदार बाळासाहेब आजबे बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ आणि नाना पाटेकर यांच्यावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी आमदार आजबे म्हणाले की, नाना पाटेकर यांचे शिराळ गावावर मोठे उपकार आहेत. गावात जलसंधारणाची कामे करताना जवळपास १५ लाख रुपयांचे डिझेल खर्च करून सलग तीन महिने काम करण्यात आले. या कामाचा लाभ शिराळ गावासह आसपासच्या परिसरातील नागरिकांना होत आहे. आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्येही नाम फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी जलसंधारणाची महत्त्वपूर्ण कामे केली. दुष्काळाच्या काळात पाणीटंचाईने त्रस्त झालेल्या लोकांना मदतीचा हात देत त्यांनी अनेकांचे संसार उभे करण्याचे काम केले. समाजाच्या दु:खात धावून जाणारा आणि सामान्य माणसाच्या अडचणी समजून घेणारा असा अभिनेता पुन्हा होणे नाही, असेही त्यांनी नमूद केले. नाना पाटेकर यांचे कार्य केवळ चित्रपटांपुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी आपल्या कर्तृत्वातून समाजकारणातही वेगळा ठसा उमटवला. त्यांच्या कार्यातून समाजाला नेहमी प्रेरणा मिळत राहील. आज नाना आपल्यात नसले, तरी त्यांनी केलेली जलसंधारणाची कामे आणि समाजसेवेचा वारसा कायमस्वरूपी जनतेच्या स्मरणात राहील. सध्या निसर्गाच्या अवकृपेमुळे दुष्काळाचे संकट निर्माण होत असताना नानांसारख्या व्यक्तिमत्त्वाची समाजाला मोठी गरज होती, अशी खंतही आजबे यांनी व्यक्त केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे यांनीही नाना पाटेकर यांच्या कार्याचा गौरव केला. चित्रपटसृष्टीत काम करताना त्यांनी अनेक कलाकारांना प्रोत्साहन दिले.



## संपादकीय

# जिच्या हाती धुनष्याची दोरी

'जेन झी' हा सध्या परवलीचा शब्द झाला आहे. कुणी त्यांच्या ऊर्जेबद्दल बोलते, कुणी शक्तीबद्दल. कुणी त्यांना बेताल ठरवून टीका करते. त्यांच्याबाबत असे सरमिसळ बोलले जात असताना, त्याच 'जेन झी'च्या एका प्रतिनिधीने इतका मोठा पराक्रम, इतक्या शांतपणे गाजवला की अवघा देश बघत राहिला!

कुमकुम अनिल मोहोड हे त्या मुलीचे नाव. ती राहते विदर्भातील अमरावती शहरातल्या गोसावी गल्लीत. तिचा जन्म २००९ सालचा. २०१८ साली; म्हणजे वयाच्या नवव्या वर्षी तिने हाती धनुष्य घेतले. सात-आठ वर्षे खडतर मेहनत केली आणि सगळ्या देशाला अभिमान वाटावा असा पराक्रम घडविला. तिरंदाजीत तिने देशासाठी दोन सुवर्ण आणि एक रौप्य पदक जिंकले. खेळण्यासाठी आणि त्यात जिंकण्यासाठी अत्याधुनिक सुविधा लागतात. भक्कम आर्थिक पाठबळ लागते.

उच्च दर्जाच्या मार्गदर्शनासाठी तज्ज्ञ लागतात. ही सगळी कारणे तिच्या धनुष्याच्या प्रत्यंचेच्या आवाजात हरवून गेली. जिद्द, परिश्रम, ध्यास ही त्रिसूत्री तुम्हाला यशाच्या अत्युच्च शिखरावर सहज घेऊन जाते, हा धडा तिच्या निमित्ताने सगळ्यांनाच मिळाला. आज तिची पदके खणखण आवाज करीत असतील. सगळे तिच्या कौतुकात आकंठ बुडाले असले तरी, तिचा प्रवास खूप सोपा नव्हता. तो धनुष्यासारखा वेडावाकडा आणि खडतर होता. पण ध्येय बाणाच्या टोकासारखे टोकदार आणि अचूक होते म्हणून ते साध्य झाले.

नात्यातली एक मुलगी तिरंदाजी करते म्हणून आपल्या मुलीनेसुद्धा तिरंदाजी करावी, असे तिच्या आईला वाटले. तिने कुमकुमला प्रोत्साहित केते. आजीने दिलेल्या तीन हजार रुपयांत तिने लाकडी धनुष्य घेतले आणि सराव सुरू केला. तिचे वडील तिला प्रशिक्षक प्रफुल्ल डांगे यांच्याकडे घेऊन गेले. प्रशिक्षकांनी तिच्या खांद्यांची ताकद, शिकण्याची जिद्द आणि तांत्रिक क्षमता तपासली. ही काही तरी चमत्कार घडविणार याची जाणीव त्यांना होऊ लागली. अवघ्या सहा महिन्यांत तर तिने सबज्युनिअर स्पर्धेत यश मिळवले. पुढची पाच वर्षे ती कुणाच्या तरी जुन्या धनुष्याच्या साह्याने सराव करीत राहिली. करोना काळात जग थांबले होते. ती धनुष्यबाणाच्या सहवासात होती. थोडे कमी अंतरावरून सराव करीत होती. पुढे खेलो इंडियाचे सेंटर आणि गिरीश कुकडे यांसारखे प्रशिक्षक तिला लाभले.

तिच्या वडिलांची आर्थिक स्थिती फार उत्तम नव्हती. मिठाईसाठी लागणारे कागदी खोके बनविण्याचा त्यांचा व्यवसाय. तो सांभाळून त्यांनी मुलीला प्रोत्साहन दिले. वेगवेगळ्या स्पर्धांसाठी ती कधी वडिलांच्या दुचाकीवर, कधी रेल्वेच्या स्लिपर क्लासने तर कधी 'लालपरी'ने गेली. आपल्या मर्यादा, आपले लक्ष्य आणि ध्येय याचा ताळमेळ साधत राहिली. एक एक स्पर्धा जिंकत राहिली. शांघाय विश्वचषक , अंताल्या विश्वचषक स्पर्धेत सांघिक खेळात ती चमकली. जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी तिची निवड झाली, तेव्हा तिचे आईवडील आणि प्रशिक्षक हेच सांगत होते की, ती पदक मिळविणार.

अंकिता भाकत आणि कीर्ती शर्मा यांच्यासोबत कुमकुमने असा काही खेळ केला, की महिलांच्या रिकर्व्ह सांघिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. हे यश साधे नव्हते, कारण ते दक्षिण कोरियाच्या विरोधात होते. १९९८पासून ते २०२२पर्यंत आशियाई क्रीडा स्पर्धेतील महिला रिकर्व्ह सांघिक सुवर्णपदकावर दक्षिण कोरीयानेच अधिराज्य गाजवले होते. धीरज बोम्मादेवरासोबत मिश्र रिकर्व्ह स्पर्धेत कुमकुमने रौप्यपदक जिंकले.

तिचा खरा कस लागला तो वैयक्तिक रिकर्व्ह प्रकारात. तिथे तिच्या समोर दक्षिण कोरियाची सम्राज्ञी ओह ये जिन उभी होती. प्रारंभी माघारलेल्या कुमकुमने नंतर संयम आणि सामर्थ्याने बरोबरी साधली. शूट-ऑफमध्ये जिनचा बाण आठ गुणांच्या वर्तुळात घुसला आणि कुमकुमने दहा गुणांचे वर्तुळ भेदले. सगळा देश आनंदी झाला. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात महिला वैयक्तिक रिकर्व्ह प्रकारात भारताला पहिल्यांदा सुवर्णपदक मिळाले.



नागपूरच्या ओजस देवतळेने २०२३च्या हांगझोऊ आशियाई क्रीडा कम्पाउंड तिरंदाजीत तीन सुवर्णपदके जिंकून इतिहास घडवला होता. कुमकुमने नवा इतिहास लिहिला. आता तिचे लक्ष्य २०२८मध्ये होणाऱ्या ऑलम्पिककडे लागले आहे. 'बाण तर बाणच असतो. निर्जीव असतो. तुमची एकाग्रता, तादात्म्य, विश्वास तुम्हाला विजयी बनवितात,' हे तिचे बोल खूप काही सांगून जातात. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी' हे महिलेचे ममतामयी वर्णन आपण ऐकत आलो. नवरात्राच्या पार्श्वभूमीवर 'जिच्या हाती धनुष्याची दोरी, ती देशासाठी सुवर्णपदकाची कमाई करी' हे दृश्य देशाने प्रत्यक्षात बघितले.

# नाना पाटेकर : भूमिका अनेक, माणूस एक

## पडद्यावर अनेक चेहरे; प्रत्येक चेहऱ्यामागे माणसाला समजून घेण्याचा एक वेगळा धडा




काही कलाकारांच्या कारकिर्दीकडे आपण मागे वळून पाहतो तेव्हा त्यांच्या चित्रपटांची संख्या, पुरस्कार किंवा लोकप्रिय संवाद आठवतात. पण काही कलाकारांच्या प्रवासाकडे पाहताना त्यांची माणसे आठवतात. त्यांनी साकारलेले चेहरे, त्यांचे आवाज, त्यांच्या चालण्याची पद्धत, एखाद्या प्रसंगात अचानक आलेली शांतता आणि संवाद बोलण्यापूर्वीचा तो क्षण—हे सगळे मनात राहते. नाना पाटेकर यांचा प्रदीर्घ अभिनयप्रवास अशाच असंख्य आठवणींनी भरलेला आहे.

रंगभूमीपासून मराठी आणि हिंदी चित्रपटांपर्यंत त्यांनी अनेक दशके काम केले. त्यांच्या वाट्याला आलेल्या व्यक्तिरेखा एकमेकींपेक्षा पूर्णपणे वेगळ्या होत्या. कधी गुन्हेगार, कधी पोलीस, कधी सैनिक, कधी वडील, कधी पती, कधी राजकारणी, कधी सामान्य माणूस, कधी सामाजिक कार्यकर्ता आणि कधी स्वतः रंगभूमीवर आयुष्य घालवलेला नट. भूमिका बदलत गेल्या; पण प्रत्येक भूमिकेत प्रामाणिकपणा कायम राहिला. त्यामुळे नाना पाटेकरांच्या कारकिर्दीकडे पाहताना केवळ एका अभिनेत्याच्या कामाची उजळणी होत नाही; भारतीय समाजातील अनेक माणसे आणि त्यांचे अनेक स्वभाव आपल्यासमोर उभे राहतात. नानांच्या अभिनयाची सर्वांत वेगळी खूण म्हणजे त्यांची संवादफेक. ते संवाद केवळ बोलत नसत; ते संवादाला परिस्थिती देत. आवाज कधी धारदार, कधी संयत, कधी उपरोधिक, कधी संतप्त आणि कधी इतका शांत की त्या शांततेतच पुढचे वाक्य ऐकू येत असे. त्यांच्या अभिनयात विरामालाही अर्थ होता. समोरच्या व्यक्तीकडे पाहण्याच्या पद्धतीलाही अर्थ होता. त्यामुळे त्यांचा एखादा संवाद आठवताना शब्दांइतकाच त्याचा आवाज आठवतो. कधी एखादे साधे वाक्य ते अशा पद्धतीने बोलत की ते वाक्य त्यांचे न राहता त्या व्यक्तिरेखेचे कायमचे वाक्य बनून जाई. त्यांचा प्रारंभिक प्रवास मराठी रंगभूमी आणि चित्रपटातून झाला. सिंहासन, भालू, रघु मैना, सावित्री, गड जेजुरी जेजुरी, अंकुश, माफीचा साक्षीदार आणि प्रतिघात अशा भूमिकांनी त्यांच्या अभिनयाची दिशा स्पष्ट केली. अंकुशमधील रवि हा व्यवस्थेच्या आणि परिस्थितीच्या कचाट्यात अडकलेल्या सामान्य माणसाचा चेहरा होता. प्रतिघातमधील कर्मवीरमध्ये अन्यायाविरुद्धचा संघर्ष होता. या भूमिका केवळ मनोरंजनापुरत्या नव्हत्या; त्या काळातील सामाजिक अस्वस्थतेला त्यांनी आवाज दिला.सलाम बॉम्बे!*मधील बाबा आणि परिंदामधील अण्णा या दोन भूमिका नानांच्या अभिनयातील विलक्षण अंतर दाखवतात. परिंदामधील अण्णा म्हणजे गुन्हेगारी जगातील सत्ता, हिंसा आणि भीती. पण नानांनी त्याला केवळ क्रूर खलनायक म्हणून उभे केले नाही. त्या माणसाच्या आतली असुरक्षितताही जाणवू दिली. त्यामुळे व्यक्तिरेखेचा तिरस्कार करतानाही प्रेक्षक तिच्याकडे पाहत राहतो. खलनायकाला प्रभावी बनवणे ही एक गोष्ट; पण त्याला मानवी गुंतागुंत देणे ही दुसरी. नानांनी दुसरी गोष्ट साधली.प्रहारमधील मेजर चौहानने त्यांच्या अभिनयाला वेगळी दिशा दिली. गणवेश, शिस्त, आदेश आणि कर्तव्य यामागचा माणूस त्यांनी साकारला. या चित्रपटाचे दिग्दर्शनही त्यांनी केले आणि भूमिकेसाठी लष्करी प्रशिक्षण घेतले. त्यामुळे नानांच्या अभिनयात केवळ संवाद पाठ करून भूमिका करण्याऐवजी व्यक्तिरेखेच्या जगात प्रवेश करण्याची तयारी दिसते. त्यांच्या दृष्टीने भूमिका म्हणजे बाहेरून घेतलेला पोशाख नव्हता; ती आतून समजून घेण्याची प्रक्रिया होती.क्रांतिवीरमधील प्रताप नारायण तिळक ही त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाची खूण ठरली. सुरुवातीला दिशाहीन आणि मद्यपानात बुडालेला माणूस पुढे अन्यायाविरुद्ध उभा राहतो. त्या भूमिकेतून एक साधा प्रश्न समोर येतो—माणूस चुकला म्हणून त्याचा पुढचा प्रवासही तसाच राहणार का? नानांनी या व्यक्तिरेखेतून परिवर्तनाची शक्यता दाखवली. संतापाला दिशा मिळाली तर तो सामाजिक शक्ती होऊ शकतो, हे प्रताप तिळकच्या प्रवासातून जाणवले.तिरंगामधील शिवाजीराव वागळे, अंगारमधील माजिद खान, राजू बन गया जेन्टलमनमधील जय, दिशामधील वसंत, दीक्षामधील कोगा पंडित आणि थोडासा रूमानी हो जाएँमधील नटवरलाल अशा भूमिकांनी नानांना एका प्रतिमेत बंदिस्त होऊ दिले नाही. लोकप्रियता मिळाल्यानंतरही त्यांनी स्वतःची पुनरावृत्ती टाळली. प्रत्येक व्यक्तिरेखेला स्वतंत्र आवाज, स्वतंत्र देहबोली आणि स्वतंत्र स्वभाव दिला.अग्निसाक्षीमधील विश्वनाथ हा मानवी स्वभावाच्या अंधाऱ्या बाजूचा चेहरा होता. संशय, मालकीची भावना आणि हिंसा यांचे भयावह मिश्रण त्यांनी प्रभावीपणे मांडले. त्याच्या अगदी विरुद्ध खामोशीमधील जोसेफ ब्रागांझा. एक वडील. मुलीवर प्रेम करणारा. तिच्या आयुष्याबद्दल काळजी करणारा. पण परिस्थितीसमोर असहाय. येथे नानांचा आवाजही बदलतो आणि अभिनयाची पद्धतही. मोठे संवाद नसतानाही भावना पोहोचतात. कधी कधी वडिलांचे प्रेम शब्दांत नसते; ते फक्त नजरेत दिसते.गुलाम-ए-मुस्तफामधील मुस्तफा, युगपुरुषमधील अनिरुद्ध, वजूदमधील मल्हार गोपाळदास, कोहराममधील मेजर अजित आर्या, भूतमधील पोलीस अधिकारी आणि वधमधील डॉक्टर—या भूमिका त्यांच्या अभिनयातील विविधता अधिक स्पष्ट करतात. एका भूमिकेत ते कठोर असतात, दुसऱ्यात संवेदनशील, तिसऱ्यात अस्वस्थ करणारे आणि चौथ्यात शांत. नानांच्या बाबतीत भूमिका त्यांच्याशी जुळवून घेत नसत; ते स्वतः त्या भूमिकेनुसार बदलत.यशवंतमधील यशवंत लोहार हा पोलीस अधिकाऱ्याचा वेगळा चेहरा होता. प्रामाणिकपणा, राग, कर्तव्य आणि व्यवस्थेशी संघर्ष या सगळ्यांचा ताण त्या व्यक्तिरेखेत होता. नाना पोलीसाची भूमिका करताना फक्त गणवेश घालत नसत; ते त्या गणवेशामागची जबाबदारीही घेऊन येत. त्यामुळे अब तक छप्पनमधील साधू आगाशे ही भूमिका देखील केवळ एन्काउंटर स्पेशालिस्टची कथा राहत नाही. कायदा, कर्तव्य आणि नैतिकता यांच्या सीमेवर उभ्या असलेल्या माणसाचा प्रश्न ती समोर आणते. अपहरणमधील तबरेज आलम, टॅक्सी नं. 9211मधील राघव शास्त्री, हू तू तूमधील भाऊ, एक: द पॉवर ऑफ वनमधील राणे, शागिर्दमधील हनुमंत सिंह आणि पाठशालामधील आदित्य सहाय या भूमिका त्यांच्या प्रवासातील आणखी काही वेगळे टप्पे. प्रत्येक वेळी देहबोली बदलली, आवाज बदलला, पण व्यक्तिरेखेवरील विश्वास कायम राहिला.आणि मग वेलकममधील उदय शेट्टी. हा नाना पाटेकरांच्या अभिनयाचा एक वेगळाच अध्याय. गुन्हेगारी जगातील माणूस, पण स्वतःच्या भावनिक गुंतागुंतीत अडकलेला. धाक दाखवतो, पण स्वतःच परिस्थितीत अडकतो. कठोर दिसतो, पण प्रसंग निर्माण झाला की प्रेक्षकांना हसवतो. नानांनी येथे आपली गंभीर अभिनेता म्हणून तयार झालेली प्रतिमा मोडून काढली. हसवण्यासाठीही तितकाच खरा असावा लागतो, हे त्यांनी दाखवले. प्रेक्षकांनी अण्णाला घाबरले होते; त्याच प्रेक्षकांनी उदय शेट्टीवर मनापासून हसले. हा विरोधाभासच नानांच्या अभिनयाची व्याप्ती सांगतो.राजनीतीमधील बृज गोपाळने सत्तेचे गणित समोर आणले. 26/11 मधील राकेश मारियाच्या भूमिकेत राष्ट्रीय शोक, तपास आणि जबाबदारीचे गांभीर्य होते. त्यानंतर डॉ. प्रकाश बाबा आमटे – द रिअल हिरोमध्ये त्यांच्या अभिनयाने आणखी एक दिशा घेतली. इथे सत्ता नाही, हिंसा नाही, विनोद नाही. केंद्रस्थानी होती सेवा. प्रतिकूल परिस्थितीत समाजासाठी काम करणाऱ्या व्यक्तीचे जीवन साकारताना नानांनी अभिनयाला सामाजिक संवेदनशीलतेशी जोडले.मराठी चित्रपटांमधील देऊळमधील भाऊ गळांडे, आपला मानूसमधील पोलीस अधिकारी, तडका आणि ओले आले यांसारख्या भूमिकांनी त्यांनी मातृभाषेशी असलेले नाते कायम ठेवले. रंगभूमीशी असलेला त्यांचा संबंध या संपूर्ण प्रवासात महत्त्वाचा होता. रंगमंच कलाकाराला कॅमेऱ्याच्या आधाराशिवाय प्रेक्षकासमोर उभे राहायला शिकवतो. आवाज पोहोचवावा लागतो. शरीर बोलावे लागते. आणि सर्वांत महत्त्वाचे—समोर बसलेल्या प्रेक्षकाचा विश्वास संपादन करावा लागतो.याच रंगभूमीच्या प्रवासातील एक साधा प्रसंग नाना पाटेकरांच्या व्यक्तिमत्त्वाची दुसरी बाजू सांगतो. हमीदाबाईची कोठीच्या प्रयोगादरम्यान अशोक सराफ अडचणीत सापडले असताना नानांनी त्यांना सुरक्षित बाहेर काढले आणि स्वतः रिक्षा चालवत त्यांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवले, अशी आठवण अशोक सराफ यांनी सांगितली होती. हा प्रसंग कोणत्याही पुरस्काराच्या यादीत नाही. कॅमेरा नव्हता. प्रेक्षक नव्हते. प्रसिद्धी नव्हती. एक कलाकार दुसऱ्या कलाकारासाठी उभा राहिला. एवढेच. पण कधी कधी एका मोठ्या कारकिर्दीचे सार सांगण्यासाठी एखादी छोटी कृती पुरेशी असते.आणि मग नटसम्राट. गणपतराव बेलवलकर. आयुष्यभर इतरांची माणसे साकारलेला रंगभूमीचा सम्राट, आयुष्याच्या उत्तरार्धात स्वतःच्या आठवणी, नाती आणि एकटेपणाशी सामना करतो. टाळ्यांचा आवाज कमी होतो. रंगमंच मागे राहतो. आणि कलाकार व माणूस यांच्यातील अंतर कमी होते. या भूमिकेकडे पाहताना नानांच्या संपूर्ण प्रवासाकडेही वेगळ्या नजरेने पाहावेसे वाटते. ज्याने आयुष्यभर अनेक चेहरे साकारले, त्याने प्रत्येक चेहऱ्यामागचा माणूस जपला.नाना पाटेकरांच्या व्यक्तिरेखांकडे एकत्र पाहिले तर एक मोठी मानवी व्याप्ती समोर येते. अण्णामध्ये सत्ता आणि हिंसा आहे. मेजर चौहानमध्ये कर्तव्य आहे. प्रताप तिळकमध्ये परिवर्तन आहे. विश्वनाथमध्ये संशयाची भीती आहे. जोसेफमध्ये पितृप्रेम आहे. यशवंतमध्ये प्रामाणिकतेचा संघर्ष आहे. साधू आगाशेमध्ये नैतिक प्रश्न आहे. उदय शेट्टीमध्ये विसंगत विनोद आहे. बृज गोपाळमध्ये सत्तेचे गणित आहे. प्रकाश आमटेमध्ये सेवा आहे. आणि गणपतराव बेलवलकरमध्ये आयुष्याच्या उत्तरार्धातील माणूस आहे.म्हणून नाना पाटेकरांच्या योगदानाकडे पाहताना केवळ चित्रपटांची किंवा पुरस्कारांची यादी पुरेशी नाही. त्यांच्या अभिनयाने माणसाच्या स्वभावातील अनेक छटा आपल्यासमोर आणल्या. कठोर माणसातही नाजूकपणा असू शकतो. चुकीचा माणूस बदलू शकतो. अधिकाराच्या गणवेशामागेही संघर्ष असू शकतो. हसणाऱ्या चेहऱ्यामागे वेदना असू शकते. आणि मोठ्या कलाकाराच्या मागे शेवटी एक साधा माणूस असतो. आज त्यांच्या प्रदीर्घ कलाप्रवासाकडे पुन्हा पाहताना, त्यांच्या कारकिर्दीने मराठी आणि हिंदी रंगभूमी व चित्रपटसृष्टीला दिलेले योगदान अधिक ठळकपणे जाणवते. त्यांनी अभिनयाला केवळ संवादांची ताकद दिली नाही; त्यांनी विरामाला अर्थ दिला, नजरेला भाषा दिली आणि व्यक्तिरेखेला तिचे स्वतंत्र माणूसपण दिले. रंगभूमीपासून चित्रपटापर्यंत त्यांनी ज्या विविध भूमिका साकारल्या, त्या भारतीय अभिनयपरंपरेतील महत्त्वाचा ठेवा आहेत.कलाकाराचा प्रवास त्याच्या प्रत्यक्ष उपस्थितीपुरता मर्यादित नसतो. त्याचे काम पुढे पाहिले जाते, पुन्हा ऐकले जाते, नव्या पिढीकडून नव्याने समजून घेतले जाते. एखादा संवाद पुन्हा कानावर पडतो. एखादी व्यक्तिरेखा पुन्हा समोर येते. एखाद्या प्रसंगातील त्यांची नजर किंवा शांतता पुन्हा लक्षात येते. तेव्हा जाणवते—कलाकाराने निर्माण केलेले काम त्याच्या व्यक्तिगत अस्तित्वापेक्षा मोठे असते.नाना पाटेकरांचा अभिनयही असाच आहे. त्यांच्या अनेक व्यक्तिरेखा त्यांच्या पुढील अभिनयातून आपल्यासमोर येणार नाहीत; मात्र त्यांनी साकारलेली माणसे, त्यांचे प्रश्न, त्यांचे संघर्ष आणि त्यांच्यातील मानवी छटा आपल्या सांस्कृतिक स्मरणाचा भाग राहतील. रंगभूमीवरून पडद्यापर्यंत आणि एका भाषेतून दुसऱ्या भाषेत प्रवास करताना त्यांनी निर्माण केलेली ही संपत्ती पुढील पिढ्यांना पुन्हा पुन्हा अनुभवता येईल.

- भूमिका संपतात. चित्रपट संपतात. प्रयोग संपतात. टाळ्यांचा आवाज थांबतो.

- पण चांगल्या अभिनयाने निर्माण केलेली जाणीव तिथे थांबत नाही.

- नाना पाटेकरांच्या प्रदीर्घ प्रवासाकडे पाहताना शेवटी पुरस्कारांची संख्या किंवा चित्रपटांची यादी आठवण्यापेक्षा, त्यांच्या व्यक्तिरेखांनी आपल्या सांस्कृतिक स्मरणात निर्माण केलेली जागा अधिक महत्त्वाची वाटते.

- भूमिका अनेक होत्या.
चेहरे अनेक होते.
आवाज अनेक होते.
स्वभाव अनेक होते.

# आरोग्य नवोन्मेष व गुणवत्ता सुधारणेसाठी राज्यस्तरीय 'लिव्हिंग लॅब' विकसित

**मुंबई : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या 'सर्वांसाठी आरोग्य' या ध्येयाला पूरक ठरणारी आरोग्य नवोन्मेष आणि गुणवत्ता सुधारणेसाठीची राज्यस्तरीय 'लिव्हिंग लॅब' विकसित होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या माध्यमातून आरोग्य सुविधांचा दर्जा आणि गुणवत्ता मानकांचे पालन सुधारण्यासह राज्यातील नागरिकांसाठी कौशल्य विकास व रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर सुद्धा भर देण्यात येणार आहे.

स्थानिक आरोग्यविषयक प्राधान्यक्रम निश्चित करणे, समुदायांसोबत उद्देशानुरूप उपाय तयार करणे आणि प्रत्यक्ष आरोग्य व्यवस्थेत नव्या पद्धतींची चाचणी घेणे, हा या व्यासपीठाचा उद्देश आहे. शासन, आरोग्यसेवा प्रदाते, खासगी क्षेत्र, शैक्षणिक संस्था, नवोन्मेषक आणि विकास भागीदारांचे अनुभव व क्षमता एका सामायिक व्यासपीठावर आणून सध्याची आरोग्य व्यवस्था आणि उपचार मार्ग अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न 'लिव्हिंग लॅब'च्या माध्यमातून करण्याचा मुख्यमंत्री फडणवीस यांचा हा प्रयत्न आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल आरोग्य, डेटा आणि 'प्रिसिजन हेल्थ'सह नवोन्मेष व तंत्रज्ञानाच्या क्षमतांचाही यासाठी उपयोग केला जाणार आहे. खासगी आरोग्य क्षेत्राची व्याप्ती व क्षमता सार्वजनिक आरोग्याच्या प्राधान्यक्रमांशी जोडणे, ही या उपक्रमातील महत्त्वाची संधी आहे. विविध भागधारकांच्या सहभागातून स्थानिक गरजांना प्रतिसाद देणारे व्यवहार्य, परवडणारे आणि सुलभ उपाय विकसित करता येतील. यशस्वी उपायांचा महाराष्ट्रासह अन्य ठिकाणीही विस्तार करण्याची क्षमता तपासली जाईल. उपक्रमाच्या पुढील टप्प्यांत समुदायाच्या आरोग्यविषयक गरजांशी निगडित स्थानिक कौशल्यविकास, रोजगार आणि उद्योगनिर्मितीच्या संधींचाही शोध घेतला जाणार आहे. केवळ नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याऐवजी दुर्गम व आरोग्यसेवेपासून वंचित घटकांसह प्रत्येक नागरिकापर्यंत नवोन्मेष पोहोचविण्यावर या संकल्पनेत भर आहे. शासन, समुदाय, नवोन्मेषक आणि भागीदारांच्या सहभागातून परिणामकारक उपायांची चाचणी, त्यातून मिळणाऱ्या अनुभवांचे वेगाने विश्लेषण आणि आरोग्यसेवेची गुणवत्ता व समानता सुधारणाऱ्या उपायांचा व्यापक विस्तार करण्याचे उद्दिष्ट आहे.पुरावेनिर्मिती आणि सहकार्याचे व्यासपीठ म्हणून 'लिव्हिंग लॅब' विकसित केली जाणार आहे. समुदायाच्या गरजा आणि स्थानिक मालकी या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी ठेवून नवोन्मेष, आरोग्य व्यवस्था आणि प्रत्यक्ष सेवा देणाऱ्या घटकांमधील समन्वय अधिक मजबूत केला जाईल. 'द फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया'चा 'मान्यता' हा प्रमुख उपक्रम या दृष्टिकोनाचे प्रारंभिक उदाहरण आहे. मातृ आरोग्यसेवा बळकट करण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना पूरक असलेल्या या उपक्रमातून खासगी क्षेत्रातील गुणवत्ता सुधारणा प्रारूप सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसोबत कशा प्रकारे कार्य करू शकते, हे दिसून येते.एमएसडी फॉर मदर्स' या उपक्रमाचा समन्वय करीत असून, या सहयोगी प्रारूपाच्या विकासासाठी विविध भागीदारांचा समूह एकत्र आणत आहे. नवोन्मेषाचे व्यवहार्य व शाश्वत उपायांमध्ये रूपांतर करून व्यवस्था बळकट करण्यासाठी भागीदारीचा उपयोग केला जाणार आहे.

# एआयच्या प्रभावी वापरातून कामकाजात सुलभता आणि गतिमानता

**नवी मुंबई : वृत्तसंस्था**

प्रशासकीय कामकाज करताना मराठीचा मान राखत, तंत्रज्ञानाची जोड देऊन आपण नागरिकांना अधिक जलद आणि पारदर्शक सेवा पुरवू शकतो. याकामी कृत्रिम बुध्दीमत्ता अर्थात एआयचा वापर या कामाला प्रचंड गतिमानता प्राप्त करून देतो त्यामुळे एआयचा स्मार्ट वापर प्रत्येकाने आपल्या कामकाजात हुशारीने केला पाहीजे व एआयशी मैत्री केली पाहीजे अशा शब्दात सुप्रसिध्द लेखक – व्याख्याते श्री.विवेक मेहेत्रे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त आयोजित उपक्रमांमधील 'कार्यालयीन कामकाजात मराठीतून कृत्रिम बुध्दीमत्तेचा अर्थात एआयचा वापर' या विषयावर विवेक मेहेत्रे बोलत होते. मुख्य विधी अधिकारी अभय जाधव यांच्या हस्ते त्यांचे महानगरपालिकेच्या वतीने स्वागत करण्यात आले. उपआयुक्त संजय शिंदे व प्रकाश कांबळे, सहा.आरोग्य अधिकारी डॉ.रत्नप्रभा चव्हाण यांची यावेळी उपस्थिती होती.1956 मध्ये कृत्रिम बुध्दीमत्ता हा शब्द उदयास आला असा इतिहास सांगत त्यांनी एआयमधील अद्ययावत सुधारणांचा प्रवास कथन केला. एआयमुळे तुमची खुर्ची हिरावली जाऊ शकते ही भीती अनाठायी असल्याचे सांगत याउलट एआयच्या कामकाजातील योग्य वापराने तुमच्या कामाला माहितीपूर्ण स्वरूप येते व काम सोपे आणि जलद होतेअसा लाभ विवेक मेहेत्रे यांनी कथन केला.जगात 3 हजाराहून अधिक भाषा असून मराठी 16 व्या क्रमांकावर आहे. एआयला मराठीतून प्रॉम्प्ट दिल्यानंतर तो मराठी भाषेत कार्यवाही करतो, हे जागतिक स्तरावरही मराठी महत्वाची भाषा असल्याचे द्योतक असल्याचे सांगत त्यांनी याचा आपण सार्थ अभिमान बाळगला पाहीजे असे सांगितले.आपल्या व्याख्यानात त्यांनी विविध उदाहरणे देत, एआयचा कामकाजात प्रत्यक्ष वापर कसा करायचा याची प्रात्यक्षिके दाखवित. एआयच्या विविध माध्यमांची माहिती देत काळाची पावले ओळखून आपण 'ई-लिटरेट' व्हायला पाहीजे असे सांगितले. यावेळी नमुंमपा अधिकारी, कर्मचारी यांच्याप्रमाणे नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.सुप्रसिध्द अभिनेते आणि शेतक-यांच्या, सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री नाना पाटेकर यांचे पहाटे 5.20 च्या दरम्यान दु:खद निधन झाले. त्यांच्या स्मृतींना या कार्यक्रमाप्रसंगी स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# माजलगाव जलाशयातून अवैध पाणी उपसा करणाऱ्यांवर संयुक्त पथकाची मोठी कारवाई; ३५० मोटारी व ५० सोलर पॅनेल हटवले







**बीड |** माजलगाव जलाशयातून मंगरूळ १ आणि मंगरूळ २ या ठिकाणी होत असलेल्या अवैध पाणी उपशाविरोधात १० ऑक्टोबर २०२६ रोजी प्रशासनाच्या संयुक्त पथकाकडून मोठी धडक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत अवैध पाणी उपसा करणाऱ्या तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून तब्बल ३५० पाण्याच्या मोटारी आणि ५० सोलर पॅनैल काढून टाकण्यात आले आहेत. प्रशासनाच्या या आक्रमक पावलामुळे अवैध पाणी उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

या कारवाईदरम्यान संबंधित शेतकरी आणि ग्रामस्थांना प्रशासनाकडून सक्त ताकीद देण्यात आली असून, त्यांच्याकडून यापुढे जलाशयातून कोणत्याही प्रकारचा अवैध पाणी उपसा करणार नसल्याचे लेखी आश्वासन लिहून घेण्यात आले आहे. पाण्याचे महत्व आणि धरणातील पाणीसाठा लक्षात घेता ही कारवाई केवळ एका दिवसापुरती मर्यादित राहणार नाही. भविष्यात पुन्हा अवैध पाणी उपसा सुरू होऊ नये यासाठी यापुढेही अशीच सातत्याने कारवाई चालू राहील, असा स्पष्ट इशारा पाटबंधारे विभागाकडून देण्यात आला आहे.

ही व्यापक कारवाई माजलगाव धरण प्रशासन, पाटबंधारे विभाग, महसूल विभाग, पोलीस दल आणि विद्युत वितरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आली. या धडक मोहिमेत पाटबंधारे विभागाचे उपअभियंता शितल माने, एस. एस. शेख, मधुकर जाधव, महसूल विभागाचे मंडळ अधिकारी हंगे, पोलीस पाटील अल्ताफ शेख, पोलीस दलाचे उपनिरीक्षक (पीएसआय), विद्युत वितरण विभागाचे एस. बी. चव्हाण यांच्यासह ग्रामसेवक तसेच सर्व संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने आणि सक्रियपणे सहभागी झाले होते.

# शालार्थ आयडी घोटाळा; एसआयटीच्या चौकशीवर प्रश्नचिन्ह

## तक्रारदाराला डावलून अधिकाऱ्यांना अभय? वर्षाताई जगदाळे

**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील कथित शालार्थ आयडी घोटाळ्याच्या चौकशीवरून आता नवा वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) कार्यपद्धतीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्षा वर्षाताई जगदाळे यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. तक्रारदाराने सुमारे २०० पानांचे पुरावे सादर करूनही अद्याप त्यांचा लेखी जबाब नोंदवण्यात आलेला नाही किंवा चौकशीचा अहवाल सादर करण्यात आलेला नाही, असा आरोप त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे.



बीड जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागातील कथित शालार्थ आयडी घोटाळ्याप्रकरणी वर्षाताई जगदाळे यांनी संबंधित यंत्रणेकडे सुमारे २०० पानांचे पुरावे आणि तक्रार सादर केली आहे. या तक्रारीची दखल घेत शिक्षण आयुक्तांनी तातडीने विशेष चौकशी समिती स्थापन केली. मात्र, समितीचे अध्यक्ष अद्याप बीडमध्ये आलेले नसल्याचा दावा जगदाळे यांनी केला आहे.तसेच, तक्रारदार आणि ज्यांच्याविरोधात तक्रार करण्यात आली आहे, अशा दोन्ही बाजूंचे लेखी जबाब नोंदवण्याचे स्पष्ट निर्देश असतानाही तक्रारदाराचा जबाब नोंदवण्यात आलेला नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणात चौकशी करणाऱ्या एसआयटीने तीन दिवसांच्या आत अहवाल सादर करण्याच्या सूचना देऊनही अद्याप अहवाल सादर केलेला नसल्याचा आरोप वर्षाताई जगदाळे यांनी केला आहे. तक्रारदाराला बाजू मांडण्याची संधी न देता, ज्यांच्याविरोधात तक्रार आहे त्या अधिकाऱ्यांसोबतच चर्चा करून एकतर्फी अहवाल सादर करण्याच्या हालचाली सुरू असल्याचा दावाही त्यांनी केला आहे."शालार्थ आयडी घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी नेमलेले एसआयटी पथकच संबंधितांना निर्दोष मुक्त करण्याच्या दिशेने काम करत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे एसआयटीच्या चौकशीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे," अशी भूमिका वर्षाताई जगदाळे यांनी मांडली.

- **महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उपसंचालक कार्यालय समोर जागरण-गोंधळ आंदोलन करणार.!**

शालार्थ आयडी घोटाळ्याची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच तक्रारदाराचा लेखी जबाब नोंदवून चौकशीचा अहवाल तातडीने सादर करावा, अशी मागणी वर्षाताई जगदाळे यांनी केली आहे.या प्रकरणी योग्य कार्यवाही न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उपसंचालक कार्यालयासमोर जागरण-गोंधळ आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# आ.धनंजय मुंडे यांना जनसेवेची मोठी संधी मिळावी यासाठी विलास जुनाळ यांचा महालक्ष्मी दरबारी घटी बसण्याचा संकल्प

**परळी (प्रतिनिधी)**

माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांचे आरोग्य सुदृढ रहावे व त्यांना जनसेवेची मोठी संधी मिळावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते विलास जुनाळ यांनी कोल्हापुर येथे महालक्ष्मी दरबारात ९ दिवस घटी बसण्याचा संकल्प केला असुन ते आपल्या काही समर्थकांसह दि.११ ऑक्टोबर पासुन घटी बसले आहेत.

माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांचे खंदे समर्थक असलेले सामाजिक कार्यकर्ते विलास जुनाळ यांनी नवरात्रोत्सवात हा संकल्प केला असुन दि.११ ऑक्टोबर रोजी ते परळीहुन कोल्हापूर येथे घटी बसण्यासाठी रवाना झाले.यावेळी गणेशपार भागातील नागरीक,व्यापार्यांनी त्यांना संकल्पपुर्तीच्या शुभेच्छा दिल्या.

पुढील ९ दिवस ते कोल्हापुरात महालक्ष्मीचरणी घटी बसुन आ.धनंजय मुंडे यांच्या आरोग्य व जनसेवेच्या मोठ्या जबाबदारी साठी प्रार्थना करणार आहेत.






# परळीत 18 ला आदर्श शिक्षक लक्ष्मणराव हुलगुंडे गुरुजींचा अमृत महोत्सव

**परळी वैजनाथ |** वैदिक वाङ्मय व संत साहित्याचे अभ्यासक, आदर्श शिक्षक व सामाजिक कार्यकर्ते पं. श्री लक्ष्मणराव हुलगुंडे गुरुजी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त येत्या रविवार दि.१८ ऑक्टोबर रोजी परळी येथील अक्षता मंगल कार्यालयात भव्य स्वरूपात अमृत महोत्सवी गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुजींचे शिष्य व स्नेहीजनांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राज्य मंत्रालयाचे निवृत्त सहसचिव व अभ्यासक श्री माणिकराव गुट्टे हे भूषवणार असून प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध विचारवंत प्रा. डॉ . श्री दत्ताहरी होनराव (उदगीर), वेदिक विद्वान पं. राजवीर जी शास्त्री (सोलापूर ) हे उपस्थित राहणार आहेत. याृवेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. ब्रह्ममुनिजी (सु.ब.काळे), तपोनिष्ठ संन्यासी स्वामी सोमानंदजी, स्वामी विद्यानंद जी , प्रा. अर्जुनराव सोमवंशी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.



स. ९.०० वा. पं. राजवीर शास्त्री व आचार्य सत्येंद्रजी यांच्या ब्रह्मत्वाखाली गौरवमूर्ती श्री लक्ष्मण आर्य गुरुजी यांचा आयुष्कामेष्टी यज्ञ होईल, तर स.१० वाजता मुख्य समारंभ संपन्न होईल. यावेळी विविध क्षेत्रातील शिष्यवृंद मनोगतांच्या माध्यमाने गुरुजींच्या प्रेरक जीवनावर प्रकाश टाकतील व शेवटी त्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते हृद्य सत्कार करण्यात येईल.

तरी या कार्यक्रमास नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे , असे आवाहन अमृत महोत्सव सत्कार समितीचे अध्यक्ष श्री जुगलकिशोर लोहिया, सचिव डॉ. सूर्यकांत मुंडे व गौरव समितीच्या सदस्यांनी केले आहे

# आ. सुरेश धस यांची नानाची वाडी येथे सांत्वन भेट; पाटेकर कुटुंबीयांचे केले सांत्वन

**आष्टी |** ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीची मोठी हानी झाली आहे. आपल्या दमदार अभिनयाने, स्पष्टवक्तेपणाने आणि सामाजिक कार्यातून रसिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करणाऱ्या नाना पाटेकर यांना आ. सुरेश धस यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

आ.सुरेश धस यांनी पुणे जिल्ह्यातील डोणजे येथील नानाची वाडी या निवासस्थानी भेट देऊन नाना पाटेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करत त्यांना आदरांजली वाहिली. यावेळी त्यांनी नाना पाटेकर यांचे पुत्र मल्हार पाटेकर यांची भेट घेऊन पाटेकर कुटुंबीयांचे सांत्वन केले.

नाना पाटेकर यांनी आपल्या अभिनयाच्या माध्यमातून मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत वेगळी ओळख निर्माण केली होती. चित्रपटांमधील विविधांगी भूमिका, परखड विचार आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी समाजमनावर आपली छाप उमटवली. विशेषतः सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील.



नाना पाटेकर यांच्या निधनामुळे कलाविश्वासह सामाजिक क्षेत्राचीही मोठी हानी झाली असून, त्यांच्या कलात्मक आणि सामाजिक योगदानाच्या आठवणी कायम जिवंत राहतील. या दुःखद प्रसंगी आ. सुरेश धस यांनी पाटेकर कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत त्यांना धीर दिला.

# पालघर जिल्हा परिषद शाळांच्या प्रश्नांसाठी SFI चे बेमुदत धरणे आंदोलन

## रिक्त शिक्षकांची पदे भरण्यासह मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी

**जव्हार (वा ) |** पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विविध गंभीर समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्टूडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI), पालघर जिल्हा कमिटीच्या वतीने सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजल्यापासून जिल्हा परिषद पालघर येथील मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) कार्यालयासमोर या आंदोलनाला सुरुवात करण्यात आली.

पालघर जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे, पिण्याच्या पाण्याची कमतरता, स्वच्छतागृहांची दुरवस्था, वर्गखोल्यांची देखभाल आणि शैक्षणिक साहित्य वेळेवर उपलब्ध न होणे अशा विविध समस्यांमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचा मुद्दा SFI ने उपस्थित केला आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, तसेच शाळांमधील मूलभूत सुविधांचा प्रश्न तातडीने सोडवावा, या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले आहे.

या आंदोलनाच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरणे, सर्व शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा व स्वच्छतागृहे उपलब्ध करून देणे, नादुरुस्त वर्गखोल्यांची दुरुस्ती करणे, विद्यार्थ्यांना गणवेश, पाठ्यपुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्य वेळेत पुरवणे, तसेच ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा अधिकार अबाधित राखणे, या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

शिक्षणाचा हक्क वाचवण्यासाठी आणि जिल्हा परिषद शाळांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी विद्यार्थी, पालक, नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते या बेमुदत धरणे आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी

झाले.या आंदोलनाचे आयोजन SFI संघटनेने केले असून ठाणे पालघर अध्यक्ष भास्कर म्हसे, उपाध्यक्ष गीता दौडा, जिल्हा सचिव वीरेंद्र धुमाडा, प्रतीक वेडगा, सुदाम गोरखाना, नितीन कानल, वंदना घाटाळ, तन्वी दौडा, विजय घाटाळ, तेजस घाटाळ आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड, मंगळवार, 13 ऑक्टोबर 2026

# संत गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याचा गळीत शुभारंभ

## प्रतिटन एक रक्कमी ३३५१ रुपये विक्रमी भाव देण्याची घोषणा

**लातूर** | शेतकऱ्यांच्या हितासाठी दिमाखाने उभा असलेल्या लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर येथील संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड अॅग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. रामेश्वर या साखर कारखान्याचा द्वितीय गळीत हंगामाचा शुभारंभ ११ ऑक्टोबर २०२६ रविवार रोजी घटस्थापनेच्या शुभ मुहूर्तावर करण्यात आला. दुसऱ्याच वर्षी गाळपास येणाऱ्या ऊसाला प्रति टन एक रक्कमी ३३५१ रुपये एवढा विक्रमी भाव देण्याची घोषणा करण्यात आली. केवळ शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी कारखान्याची उभारणी केली असल्याची माहिती चेअरमन राजेश कराड यांनी दिली.





लातूर तालुक्यातील संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड अॅग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. रामेश्वर या साखर कारखान्याचा चालू वर्षीचा गळीत हंगाम शुभारंभ ११ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरी, ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर, ह.भ.प. बाबा महाराज बोराडे काटगावकर आणि ह.भ.प. लालासाहेब पवार महाराज देवळेकर यांच्या शुभहस्ते ऊसाची मुळी गव्हाणीत टाकून करण्यात आला.

याप्रसंगी कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तुळशीरामअण्णा कराड, काशीरामनाना कराड, अंबा कारखान्याचे दत्ताआबा पाटील, बालासाहेबतात्या कराड, चेअरमन राजेश कराड, राजाभाऊ औताडे, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, पाणंद व शेत रस्ता समिती सहअध्यक्ष सुरज शिंदे, उपसभापती शरद देरकर, भाजपाचे प्रताप पाटील, महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, कमलाकर कोपले, साहेबराव मुळे, गोपाळ पाटील, विश्वास कावळे, मनोज कराड, पद्माकर चिंचोलकर, राजकिरण साठे, गोविंद नरहरे, विजय काळे यांची प्रमुख उपस्थिती होती प्रारंभी ऋषिकेश कराड, देवेंद्र कराड, रणवीर कराड यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली.

कारखान्याच्या प्रगतीत शेतकऱ्यांची प्रगती आहे आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीत राष्ट्राची गती आहे. शेतकरी कुटुंबात जन्म घेऊन शेतकऱ्यांचे दुःख, वेदना जाणून शेतकरी हितासाठी कराड परिवाराने कारखान्याची उभारणी केली. या परिवाराला संत महात्म्यांचे आशीर्वाद असून या कारखान्याची भरभराट होईल अशा सदिच्छा देऊन याप्रसंगी ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरी, ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर, ह.भ.प. बाबा महाराज बोराडे काटगावकर यांनी दुष्काळाचे संकट नाहीसे व्हावे अशी प्रार्थना केली.

कारखान्याचे चेअरमन राजेश कराड यांनी आपला कारखाना कोणाशी स्पर्धा न करता योग्य दिशेने वाटचाल करीत असल्याचे सांगून यावर्षी गाळपास येणाऱ्या ११ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरच्या ऊसाला ३१५१ रुपये, १ डिसेंबर ते १५ जानेवारी दरम्यानच्या ऊसाला ३२५१ आणि १५ जानेवारी नंतर येणाऱ्या उसाला ३३५१ रुपये भाव देणार असल्याची घोषणा करून यावर्षी दिवाळी करिता शेतकरी सभासद आणि गेल्या वर्षी ऊस दिलेल्या शेतकऱ्यांना ३० रुपये दराने १० किलो गूळ पावडर देण्यात येईल. कारखान्याच्या कर्मचाऱ्यांना सात टक्के पगार वाढ आणि दहा टक्के दिवाळी बोनस देण्याची घोषणा केली. ऊसतोड मजुरांना दरवर्षी दिवाळी फराळाचे वाटप केले जाईल असे बोलून दाखवले.

संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याची उभारणी केवळ शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून करण्यात आली आहे. बाहेरील कुठल्याही वजन काट्यावर ऊसाचे वजन करून आणा आपल्या कारखान्याच्या वजन काट्यात फरक पडला तर त्याच दिवशी कारखाना बंद केला जाईल असे सांगून राजेश कराड यांनी उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले.

गळीत हंगाम शुभारंभ सोहळ्यास रवींद्र काळदाते, बाबासाहेब घुले, बालासाहेब शेप, भैरवनाथ पिसाळ, बाबा भिसे, अशोक सावंत, भागवत गीते, बालासाहेब कदम, प्रशांत पाटील, धनंजय जाधव, आदिनाथ मुळे, किरण मुंडे, शुभम खोसे, बालाजी गवळी, ज्ञानेश्वर माचवे, अंकुश गणगे, गोविंद मुंडे, कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकरी आणि कारखान्याचे भागधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेलगाव येथे श्री क्षेत्र रेणुकाई देवीचा शारदीय नवरात्र महोत्सवाला प्रारंभ; विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**आष्टी प्रतिनिधी :**

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील आराध्य दैवत श्री रेणुका माता मंदिरात श्री रेणुका मातेच्या कृपाशीर्वादाने सालाबादप्रमाणे यंदाही १८ व्या वर्षी शारदीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणाऱ्या या महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, जागर आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, बेलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या महोत्सवानिमित्त दररोज सायंकाळी ९ ते ११ या वेळेत नामवंत कीर्तनकारांची कीर्तने आणि विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये ह.भ.प. गौरीताई बेलेकर महाराज (आंबीजोगाई), ह.भ.प. समाजप्रबोधनकार वैष्णवीताई सुपेकर, ह.भ.प. रवि महाराज बबन काळे, ह.भ.प. शरद महाराज काळे, ह.भ.प. प्रल्हाद महाराज माळी, ह.भ.प. शिवचरित्रकार बबन महाराज समझकर यांच्यासह विविध कीर्तनकारांच्या सेवांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवादरम्यान बेलगावसह परिसरातील विविध गावांतील भाविक व दानशूर भक्तांनी अन्नदानासाठी पुढाकार घेतला आहे. सकाळचे व सायंकाळचे अन्नदान तसेच विविध दिवसांच्या कार्यक्रमांसाठी अनेक भाविकांनी सहकार्य केले आहे.

२० ऑक्टोबरला काल्याचे कीर्तन व महाप्रसाद

महोत्सवाची सांगता मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. रेणुकाताई पोकळे महाराज (बेलगावकर) यांच्या सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.



त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री रेणुका मातेच्या भक्तीमय वातावरणात पार पडणाऱ्या या नवरात्र महोत्सवात भाविकांनी सहकुटुंब सहभागी व्हावे, असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, बेलगाव, ता. आष्टी, जि. बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी परळी तालुका प्रशासन सज्ज; १२ मतदान केंद्रांवर तयारी पूर्ण, ५६ अधिकारी-कर्मचारी नियुक्त

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी परळी वैजनाथ तालुका प्रशासन सज्ज झाले आहे. तालुक्यातील १२ मतदान केंद्रांवर आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली असून, मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी ५६ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघासाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा प्रशासनाने निवडणुकीची तयारी पूर्ण करण्यासाठी विविध कक्ष स्थापन करून संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत.



१२ मतदान केंद्रांवर व्यवस्था, परळी वैजनाथ तालुक्यात एकूण १२ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. या केंद्रांवर एकूण ५६ अधिकारी-कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, निवडणूक प्रक्रिया व्यवस्थित पार पाडण्यासाठी चार झोनल अधिकारीही तैनात करण्यात आले आहेत. मतदान केंद्रांवर आवश्यक मनुष्यबळ, मतदान साहित्य आणि मतदारांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मतदान केंद्रांच्या १०० मीटर परिसरात सुरक्षा व्यवस्था राखण्यासाठी पोलीस कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकारी तसेच त्यांच्या अधिनस्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या आहेत. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. कोणत्याही प्रकारे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

परळी वैजनाथ तालुक्यातील मतदान केंद्रे पुढीलप्रमाणे आहेत. १. न्यू हायस्कूल थर्मल स्कूल, परळी वैजनाथ (८१४), २. सरस्वती विद्यालय, परळी वैजनाथ (८१६), ३. विवेकवर्धिनी विद्यालय, (शारदानगर) परळी वैजनाथ (८१७), ४. कृषी उत्पन्न बाजार समिती, परळी वैजनाथ (८१८), ५. लिटल फ्लॉवर स्कूल, परळी वैजनाथ (८१९), ६. जिल्हा परिषद हायस्कूल, मुलींची शाळा, उत्तर बाजू, परळी वैजनाथ, ७. पंचायत समिती हॉल (८२०),८. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, नागापूर (८२२), ९. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोहा (८२३), १०. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गाढे पिंपळगाव (८२५), ११. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सिरसाळा (८२१), १२. जिल्हा परिषद शाळा, धर्मापुरी (८२४) हे आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व आवश्यक प्रशासकीय तयारी करण्यात आली असून, पदवीधर मतदारांनी निर्धारित वेळेत मतदान केंद्रावर उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर आणि तहसीलदार विनोद रनवरे यांनी केले आहे.

# रेणापूर तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी चंद्रकांत कातळे, सरचिटणीस सिद्धार्थ चव्हाण; कार्यकारिणीची एकमताने निवड

**लातूर** | पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासह लोकहिताचे उपक्रम राबविणे आणि बदलत्या काळातील पत्रकारितेला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने रेणापूर तालुका पत्रकार संघाची स्थापना करण्यात आली. संघाच्या अध्यक्षपदी चंद्रकांत कातळे तर सरचिटणीसपदी सिद्धार्थ चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल कटके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पत्रकारांच्या बैठकीत नूतन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली.

पत्रकारांच्या अडीअडचणी सोडविणे, पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटितपणे प्रयत्न करणे, विविध विधायक व जनहिताचे उपक्रम राबविणे तसेच पत्रकारितेतील बदलत्या प्रवाहांशी सुसंगत राहण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे, कार्यशाळा आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. तालुक्यातील सर्व पत्रकारांना एका व्यापक व्यासपीठावर आणण्याच्या उद्देशाने रेणापूर तालुका पत्रकार संघाची स्थापना करण्यात येऊन नूतन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली.





रेणापूर तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी चंद्रकांत कातळे, उपाध्यक्षपदी मधुकर गालफाडे, सरचिटणीसपदी सिद्धार्थ चव्हाण, सहसचिवपदी कोंडीराम काळे तर कोषाध्यक्षपदी रफीक शेख - शिकलकर यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून बालाजी कटके, ईश्वर बद्दर, शेख निजाम आणि राजकुमार अपसिंगेकर यांचा समावेश करण्यात आला आहे.

पत्रकारितेतील आव्हाने, पत्रकारांच्या समस्या आणि जनहिताच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी संघटित प्रयत्न करण्याची भूमिका यावेळी व्यक्त करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांचे उपस्थित पत्रकारांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या नव्या संघटनेच्या माध्यमातून तालुक्यातील पत्रकारांना एक सक्षम व्यासपीठ उपलब्ध होणार असून, पत्रकारिता आणि सामाजिक बांधिलकी यांचा समन्वय साधण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# 'तू ये रे पावसा...' कीर्तन सेवेतून दुष्काळाची भयावहता अधोरेखित

## पारगाव जोगेश्वरी येथे जोगेश्वरी मातेच्या शारदीय नवरात्र महोत्सवास प्रारंभ

**आष्टी प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र पारगाव जोगेश्वरी येथे जोगेश्वरी मातेच्या शारदीय नवरात्र महोत्सवास भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. यावेळी आपल्या कीर्तन सेवेतून 'तू ये रे पावसा...' या भावस्पर्शी सादरीकरणाद्वारे दुष्काळाची भयावहता, पावसाअभावी शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेसमोर उभ्या राहिलेल्या संकटांचे वास्तव भाविकांसमोर मांडताना ह.भ.प. नेहाताई महाराज भोसले साळेकर (भोर) यांनी उपस्थितांची मने हेलावून टाकली.



भक्तिरसासोबतच सामाजिक वास्तवाची जाणीव करून देणाऱ्या या कीर्तनातून पावसाची आस, शेतकऱ्यांची व्यथा आणि दुष्काळग्रस्त परिस्थितीचे विदारक चित्र प्रभावीपणे मांडण्यात आले. जोगेश्वरी मातेच्या नवरात्रोत्सवाला धार्मिकतेसोबतच सामाजिक संवेदनशीलतेची जोड मिळाल्याने या कीर्तनाची भाविकांमध्ये विशेष चर्चा रंगली.